करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्षे 34 वे
| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.११ | पाने-१२ | दि.१०/०१/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.

दत्त ज्वेलर्स
खास मकर संक्रांतीनिमित्त
जोडवे व पायल महोत्सव
आमच्याकडे फॅन्सी नथ, पैजन, लेडीज अंगठी, गंठन, नेकलेस, एरिंगस्, फुल, जोडवे, राणी हार व सर्व प्रकारचे दागिणे मिळतील !
५ हजार रू. पर्यंतच्या खरेदीवर हमखास भेटवस्तू !
ऑफर : १ जानेवारी ते ३० जानेवारी २०२५ पर्यंत
दत्तपेठ, सुभाष चौक, करमाळा.(9420664419/9765764321)

हॉटेल राजयोग
बायपास रोड, करमाळा., जि.सोलापूर.
व्हेज
• शुध्द शाकाहारी
• चायनीज
लॉन्स
मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण, साखरपुडा, नामकरण सोहळा, गेट-टूगेदर, कंपनी पार्टीसाठी सर्व सुविधा उपलब्ध..!
प्रोप्रा : राजेंद्र मोरे (मो.9503175444)

# दिग्विजय बागल यांचे वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

करमाळा : मकाई सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन व शिवसेनेचे विधानसभेचे उमेदवार दिग्विजय बागल यांचा १२ जानेवारीला असलेला वाढदिवस विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये राजस्तरीय डान्स स्पर्धा,रक्तदान शिबीर, विविध क्रिडा स्पर्धा तसेच रूग्णांना फळे वाटप अशा उपक्रमाचा समावेश आहे.

यानिमित्ताने राज्यस्तरीय डान्स स्पर्धा होणार असून त्यामध्ये ९ ते १५ वर्षे हा लहान गट असून १५ वर्ष ते पुढील हा खुला गट आहे. खुल्या गटासाठी प्रथम क्रमांक ११,५५५ रू., व्दितीय क्रमांक ७५५५ रू., व तृतीय क्रमांक ५५५५ रू. बक्षीस आहे. तर लहान गटासाठी प्रथम क्रमांक ७५५५ रू., व्दितीय क्रमांक ५५५५ रू., तृतीय क्रमांक ३५५५ रू. बक्षीस आहे. ही स्पर्धा मांगी येथील स्वाभिमानी शक्तीस्थळावर १२ जानेवारीला सायंकाळी सहा वाजता होणार आहे. या स्पर्धेचे आयोजन नवयुग तरूण मंडळ, मांगी यांनी केले आहे.

याच दिवशी करमाळा येथील बागल संपर्क कार्यालयात सकाळी नऊ ते पाच या कालावधीत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. याबरोबरच अन्य कार्यक्रमही याच दिवशी घेतले जाणार आहेत.



दिग्विजय बागल यांनी राज्यातील सहकारी साखर कारखान्याचे सर्वात युवा चेअरमन म्हणून कामकाज पाहिले आहे. तसेच प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी शिवसेनेत प्रवेश करून विधानसभा निवडणूक लढवून या निवडणुकीत जोरदार लढत दिलेली आहे. विधानसभा निवडणुकीच्या कालावधीत त्यांनी करमाळा तालुका व माढा तालुक्यातील ३६ गावात जोरदार संपर्क जोडलेला असून त्यांना युवकांचे मोठे पाठबळ मिळाले आहे.

अपयशानंतरही ते नाराज न होता, तालुक्यात जोरदारपणे काम करत आहेत. विविध समस्या सोडविण्यासाठी ते कार्यरत आहेत.



आनंदी जगण्यासाठी त्रास नसतो तर दु:खी जगण्यासाठी त्रास असतो.....!

**संपादकीय.......................................!**

# सन्मानाने जगा रे..!

माझा युवक पक्षकार म्हणजे फक्त २७ -२८ वर्षाचा मुलगा गेल्याची बातमी समजली आणि धक्का बसला. हा कसा गेला हे समजले नाही पण त्याला दारूचे व्यसन होते, त्यातच तो गेला हे नक्की..! एवढ्या लहान वयात व्यसन लागते कसे आणि त्यातून सर्व धुळीला मिळते कसे हेच समजत नाही. या तरूणाचा प्रेमविवाह होता. दोघांनी अगदी घरच्यांना न विचारता लग्न जमवले व केले पण..! विशेष म्हणजे त्यांना एक चार वर्षाचा मुलगा होता. सर्वकाही सुखात असताना याला दारूचे व्यसन लागले आणि त्यात सर्व बरबादी झाली. संसार मोडला, कोर्टात खटले दाखल झाले आणि केसेस सुरू असतानाच त्याचा याच दारूपायी मृत्यू झाला. वि.वा.शिरवाडकरांच्या 'नटसम्राट' मध्ये गणपतराव तथा अप्पासाहेब बेलवलकरांचं एक गाजलेलं वाक्य म्हणजे 'टु बी ऑर नॉट टु बी, दॅट इज द क्वशन' माणसानं मरावं की जगावं ? हा एक प्रश्न आहे. ज्यांची जगण्यावरची श्रध्दा संपते त्यांनाच हा प्रश्न पडतो.

संत तुकाराम महाराज म्हणतात.. "अल्प आयुष्य मानव देह। शत गुणीले अर्ध रात्र खाय। मध्ये बालत्व पीडा रोग क्षय।भजनासी काय उरले गा... राम राम स्मरा आधी।" मनुष्य देहाचा भरोसा नाही, जे आयुष्य आहे त्यात झोप, बालपण, आजार आणि संकट. मग अशा आयुष्यात देवाचे नामस्मरण कधी येणार..? असा प्रश्न करून ते तातडीने नामस्मरण घ्या, असे म्हणतात. याचा सरळ अर्थ असा आहे की, तुम्हाला मनुष्य देह मिळाला आहे ना, मग त्याचे सार्थक होईल असे काहीतरी करा. जन्माला आला तर पशू-पक्षासारखं फक्त (आहर,भय,मैथून ) खाणे-पिणे,काम करणे आणि एक दिवस राम नाम सत्य म्हणणे.. असे जगू नका. जीवनात संकटं येतात त्यावर मात करावी आणि पर्याय निवडून समाधान कसे मिळेल; याचा विचार करावा. संकटाला घाबरून व्यसन करणं हा तर भेकडपणा आहे. हिंमत महत्वाची आहे.

जीवनात कोणाला संकट नाही ? हरीवंशराय बच्चन म्हणत.."हिंमत करनेवालों की हार कभी नही होती । लहरोंसे डरकर नौका पार नही होती। नन्ही चिटी जब दाणा लेकर चलती है। चढती दिवारपर सौ बार फिसलती है। मनमें विश्वास रगोमे साहस भरता है। चढ कर गिरणा, गिरकर चढणा , नही अखरता है। अखीर उसकी कोशीश बेकार नही होती। हिंमत करनेवालोंकी हार कभी नही होती।।" खरंतर जगणं लढण्यासाठी असतं हे प्रथम मान्य केले पाहिजे. समजा एखादा पाण्यात पडला त्याला पोहता येत नसावं, नाका तोंडात पाणी जातेय, तो गटांगळ्या खातोय व त्याला विचारावं पाण्यात पोहण्याचा आनंद वाटतोय ना..? तो म्हणणार 'बाबा मी जगेल याचा भरोसा नाही अन् कसं वाटतय ? हा काय प्रश्न झाला ?' तसाच हा प्रश्न वाटतो ना..! पण बुडणाऱ्याला सांगितले.. 'बाबा तू घाबरू नकोस तू हाताने पाणी पोटाखाली घे, पाय हालवत रहा, तू तरंगशील..!' त्याने प्रयत्न केला व तो पाण्यावर तरंगला. त्याला पोहण्याची कला अवगत झाली. पाण्याची भिती तर गेलीच पण पुन्हा तो पाण्यात कधीही उतरू शकतो. संकटावर मात करण्याचा मंत्र समजला की जगण्याला वेगळीच मजा येते. त्यामुळेतर पुर्वजांनी म्हटले आहे.' संकटं शाप नसतात तर ती वरदान असतात.' त्यामुळे जीवनात कर्ज असो, नाहीतर आजारपण असो, नाहीतर दुष्काळ असो व अपघात असो. त्यांच्याबरोबर लढण्यासाठी सजग राहिले पाहिजे व मनाची तयारी केली पाहिजे. काही शेतकरी खुप निराश होतात, त्यांची जगण्यावरची श्रध्दा उडून जाते पण अनेकांनी आपली शेती जगवण्यासाठी खूप युक्ती-प्रयुक्ती राबवल्या आहेत. आपल्या कल्पकतेच्या व मेहनतीच्या जोरावर त्यांनी संकटावर मात करत जगण्याचा आनंद लुटत आहेत. प्रत्येक गोष्ट कठीण व गंभीर आहे.., असे म्हणत बसलोतर जीवनात काहीच मिळवता येणार नाही.

खरंतर मनुष्याचा जन्म एकदाच येतो हेच आपण विसरून जातो. जर एकदाच जन्म येणार असेलतर त्यामध्ये सतत चिंतेला काय म्हणून स्थान द्यावे, कल्पकतेला का स्थान नको...? आलेली संकटे निवारण्यासाठी वेगळा विचार का नको..? आपण निसर्गात वावरत असूनही निसर्गाच्या कृतीकडे पाहात नाही. नदी जेंव्हा वाहते तेंव्हा वाटेत मोठ मोठे दगड, ओघळ, वळणे येतात पण नदी थांबते का..? ती या सर्वांना पुरून उरते व पुढे पुढे वाहत जाते. वाहत तर जाते पण काठावरच्यांची तहान भागवत जाते, हे विसरून चालत नाही.

जीवन कसे जगावे ? याच्या भिन्न कल्पना असल्यातरी जीवन आनंदी असावे याबाबत एकमत असायला हरकत नाही. कष्ट तर सर्वांनाच करावे लागतात,पण कष्टाचे चीज होत नाही म्हणून अनेकजण जीवनावर रूष्ट होतात. प्रत्यक्षात कोणतेच कष्ट वाया जात नसतात. त्यातून पुरेपूर मोबदला मिळालेला असतो. फक्त आपली नजर त्याकडे नसते. आपण प्रत्येक कष्टाची मोजदाद ही पैशात करतो व तेथेच घोटाळा होतो. जेंव्हा नवीन वकील सुरवातीला व्यवसाय करत असतो तेंव्हा खूप मेहनत करूनही त्याच्या हातात खूप कमी पैसे पडतात तर वरीष्ठ वकील केवळ सही करून व युक्तीवाद करून हजारो रूपये मिळवतात व पक्षकारही त्यांना पैसे देतात. नवीन वकील नाराज झालातर तो भविष्यात वरीष्ठ वकीलाचा सन्मान कधीच मिळवू शकणार नाही. सुरवातीला कष्ट हे शिकण्यासाठी पडतातच, अनेकांना पैसे मिळतात हे दिसते पण त्यामागे त्यांची मेहनत व कल्पकता ही आपल्या लक्षात कधी येत नाही. प्रत्येक क्षेत्रात सुरवात ही कष्टाची व अपयशाची असते पण त्यातून जे ज्ञान मिळते ते आयुष्याला पुरेल इतके असते हे विसरून चालत नाही. शेतीच्या बाजारावर अनेकजण नाराज होतात पण ज्या शेतकऱ्यांने कल्पकता लढवून हजारो कडब्याच्या पेंढ्याच्या गंजी साठवून ठेवल्या व भाव आल्यावर काढल्यातर गंजीतून त्यांना लाखो रूपये मिळतात. ज्यांनी शेततलावात पाणी साठवून ठेवले व त्यातून पीके आणली आहेत ते लखपती होतात. ज्यांनी धान्याची साठवण करून बाजारात भाव वाढल्यावर काढले त्यांना धान्य विक्रीतून लाखो रूपये मिळतात.

काही तरूण जिद्दीच्या जोरावर गाव सोडून शहरात गेले, फुटपाथवर राहिले, वडापाव खावून जगले. अपमान सहन केले पण त्यांनी हिंम्मत सोडली नाही ते आज करोडपती झाले. आपलेच लोक आज शहरात सन्मानाने उभे आहेत. त्याचे कारण आपले लोक कष्ट करायला शिकले आहेत, त्यातून त्यांना जगण्याचा नवा मंत्र मिळाला आहे. पण जे आडीवर आडी घालून केवळ पाटीलकी करत आहेत,व्यसन करत आहेत,गावातच जुगार खेळतात, इतरांना दोष देण्यात धन्यता मानतात ते कधीच प्रगती करू शकत नाही.

संकटं अडचण नाहीतर एक नवी संधी घेऊन येतात. जगात कोणतीही घटना वाईट किंवा चांगली असत नाही. काही घटनेत चांगुलपणा जास्त ती आपल्याला चांगली वाटते तर काही घटनेत वाईटपणा जास्त ती घटना आपणाला वाईट वाटते. आपण सकारात्मक विचारातून त्यातील चांगल्या बाबी विचारात घेतल्यातर निराशा निघून जाते. त्यामुळे वाट्याला येणाऱ्या प्रत्येक क्षणाच्या स्वागताला आपण सज्ज राहायला पाहिजे. जीवन जगत असताना आजूबाजूच्या घटनाचे ताणतणाव शरीर व मनावर पडत असतात. ते ओळखता आले पाहिजे मग शरीरावर आपण ताणतणाव येणार नाही. प्रत्येक प्रसंगात चांगले शोधून सकारात्मक वागता आले तर जगणे खूपच सोपे होते.आपल्या जीवनात झाकून ठेवण्यासारखे काही नसलेतर चिंता राहत नाही व चिंता नसलीतर दु:ख असत नाही. जिथे दु:ख नसते तिथे माणसं उत्साहाने वागतात. जीवन जगताना दोन गोष्टी नेहमी आढळतात. काहीजण फक्त स्वत:चाची काळजी घेतात तर काहीजण स्वत:ची आजीबात काळजी घेत नाहीत. या दोन्ही गोष्टी वाईट आहेत.जीवन जगण्याची कला म्हणजे व्यक्तीगत आयुष्य व सामाजीक आयुष्य यातील समतोल राखणे होय. समाजाची काळजी घेत स्वत:ची प्रगती केली पाहिजे. जगण्याचा आनंद घेण्यासाठी स्वत:कडे लक्ष दिले पाहिजे, स्वत:साठी वेळ दिला पाहिजे, आरोग्याची काळजी घेत इतरांना आनंद वाटेल असे कृत्य ठेवल्यास जगण्यावरची श्रध्दा वाढते. आपले परिवार, स्नेही, मित्र परिवार यामध्ये सुसंवाद, सामंजस्य व सच्चेपणा पाहिजे.

बऱ्याचवेळा आपण जसे आहोत त्यापेक्षा वेगळे व्हावे वाटते. अर्थातच आपण ज्या क्षेत्रात आहोत तेथे उच्च स्थानावर जावे ही महत्वाकांक्षा असणे कधीही चांगले पण वेगळ्या क्षेत्राचा हव्यास आला व त्यात यश आले नाही की दु:ख अटळ असते. अशासाठी चांगली पुस्तके वाचनात पाहिजे, चांगले मित्र सोबत पाहिजे व त्यांच्या बरोबर सुसंवाद अवश्यक आहे. चांगले मित्र मित्राला उंच पोहचवतात तर वाईट मित्र मित्राला आत्महत्येच्या तक्तावर पोहचवतात. बऱ्याच वेळा आपण भुतकाळात रंगून जातो आणि विचार करतो , अरे माझ्या पुर्वीच्या आयुष्यात काही मजा आली नाही. माझं जगणं बोगस गेलं की काय..? तर कधी कधी भविष्यात कसे होणार..? याची चिंता वाहतो. नको नको ते भविष्यातले प्रश्न मनात आणून चिंता करतो तेथेही जीवन जगणे अस्वस्थ असते. खरंतर आपले जगणे भूत-भविष्य-वर्तमान या ठोकळेबाजपणावर नसून सतत वाहणारा प्रवाह आहे, हे विसरून चालणार नाही.

पुन्हा एकदा सांगावसं वाटतं 'आपल्याला मिळालेलं आयुष्य हे एकदाच मिळालेलं आहे. पुन्हा हे आयुष्य नाही व त्याचा स्वाद पुन्हा नाही. त्यामुळे या जगण्यात कसं जगायचं याचं भान प्रत्येकांनी ठेवले पाहिजे !' मंगेश पाडगावकर म्हणतात.., "तुम्हीच सांगा कसं जगायच... कण्हत कण्हत की गाणं म्हणत.. पायात काटे रूतून बसतात हे अगदी खरं आहे आणि फुलं फूलून येतात हे काय खरं नसतं..? काट्या सारखं सलायचं की फुलासरखं फुलायचं तुम्हीच ठरवा । सांगा कसं जगायचं.. कण्हत कण्हत की गाणं म्हणत..!"

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



# जय बजरंगबली
## टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

**• नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) वाराणसी, गोरखपूर, प्रयागराज, काठमांडू, मनोकामना, लुंबिनी, अयोध्या, पोखरा

**• काशी दर्शन** काशी, गया, आयोध्या, प्रयाग

**• गुजरात दर्शन**
गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम, अक्षरधाम, स्टेचु ऑफ युनिटी, सरदार वल्लभभाई पटेल पुतळा
कालावधी : दि.३/१/२०२५ ते ११/१/२०२५
सहल खर्च : रू.१४,०००

**• कन्याकुमारी दर्शन**
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी : दि.१६/१/२०२५ ते २६/१/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

**• गंगासागर दर्शन**
गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
कालावधी : दि.३०/१/२०२५ ते ७/२/२०२५
सहल खर्च : रू.१२,८००

**• केरळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी)
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, मधुराई, रामेश्वरम्
कालावधी : दि.११/२/२०२५ ते २३/२/२०२५
सहल खर्च : रू.३१,५००

**• वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन**
माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
सहल खर्च रू.२६,०००

**• वैष्णोदेवी दर्शन**
माता वैष्णोदेवी, शिवखोरी, जम्मू अमृतसर, अटारी बॉर्डर, दिल्ली
कालावधी : दि.९/३/२०२५ ते १७/३/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

**• मथुरा दर्शन**
मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन, बरसाना, गोवर्धन पर्वत, नंदगाव
कालावधी : दि.२२/३/२०२५ ते २८/३/२०२५
सहल खर्च : रू.९,१००

• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय




संपर्क
**श्री.मयुर राऊत**
बुकींग सुरू
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८



# मेहेर नेत्र व दंत रूग्णालय
शिंदे हॉस्पीटल जवळ, शाहुनगर, करमाळा., जि.सोलापूर

**पाहिजेत**

आमच्या हॉस्पीटलसाठी खालील कामगार भरती करायची आहे.

| क्र. | पदाचे नाव | संख्या | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | ANM / GNM | २ | नेत्ररोग/दंत विज्ञानातील अनुभव |

तरी पात्र पुरुष व महिलांनी हॉस्पीटलच्या पत्त्यावर/मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा

**संपर्क: मो.नं.९७६६५७९६९६**


# सुरताल संगीत विद्यालयाचा २७ वा वर्धापन दिन साजरा



करमाळा(सं.प्र.) : येथील सुरताल संगीत विद्यालयाचा २७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त कर्नाटक येथील कु.पालसप्रिया दास (धारवाड) यांनी शास्त्रीय गायन सादर केले. तसेच बालगीते, स्फूर्ती गीते लहान मुलांनी सादर केली. यावेळी न्यायाधीश शरद देशपांडे, विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे, यशकल्याणीचे गणेश करे-पाटील, डॉ.कविता कांबळे, डॉ.श्रध्दा जवंजाळ, ॲड.बाबूराव हिरडे, श्रेणिक खाटेर, संगीता खाटेर, मिलींद फंड आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी केला. यावेळी करमाळा सुर सरस्वती अवॉर्ड पलासप्रिया दास, सुरताल नृत्य कलानिधी अवॉर्ड संगीता सरकार (कोलकता), सुरताल नृत्यभूषण अवॉर्ड मौलिमा राज (कोलकता) व सुरताल नृत्य शिरोमणी अवॉर्ड निर्मला नेगी (उत्तराखंड) यांना देण्यात आला. सुरताल रसिक पुरस्कार उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांना जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमात भरतनाट्यम, कथक नृत्य यांचे विशेष सादरीकरण करण्यात आले. प्रास्ताविक संतोष पोतदार यांनी केले. आभार नानासाहेब पठाडे यांनी मानले.

# गुरूकुल पब्लिक स्कुलमध्ये पोलीस रेझिंग डे साजरा

करमाळा(सं.प्र.) : येथील गुरुकुल पब्लिक स्कुल मध्ये सावित्रीबाई फुले जयंती व पोलीस दलाचा रेझिंग डे साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक विनोद घुगे, पोलीस उपनिरीक्षक गणेश दळवी, पोलीस अंमलदार राजन सातव उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगतातून व नाटकातून सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी माहिती दिली. स्त्री शिक्षणात सावित्रीबाई फुले यांचा सिंहाचा वाटा आहे, हे नाटकातून दाखवून देण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांना असलेली पोलीसांची भिती नाहीशी करण्यासाठी पोलीस दलातील पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व इतर अधिकाऱ्यांना बोलावून रेझींग डे साजरा करण्यात आला. यानिमित्त पोलीस दलातील विविध शस्त्रांविषयी माहिती देण्यात आली. पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे संस्थापक नितीन भोगे, सचिव रेश्मा भोगे यांचेसह सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.


# डॉ.शेलार हॉस्पिटल

**नवीन प्रशस्त जागेत नवीन रूपात...**
दि.२६ जानेवारी पासून
**स्थलांतर**



**नवीन पत्ता : ICICI बँकेच्या पाठीमागे, श्रावणनगर, करमाळा.**
टीप : हॉस्पीटल कामासाठी स्टाफ पाहिजे. गरजूंनी संपर्क करावा..!

## पत्रकारितेची परंपरा जपण्यासाठी

# शासनाने पत्रकारांना खऱ्या न्याय देण्यासाठी काम करावे : ॲड.हिरडे



करमाळा(सं.प्र.): आजच्या डिजीटल युगात खऱ्या अर्थाने निस्वार्थ भावनेने काम करणारा पत्रकार हाच एकमेव घटक समाजामध्ये असल्यामुळे लोकशाही जिवंत आहे. पत्रकारितेची परंपरा जपण्यासाठी शासनाने पत्रकारांना खऱ्या अर्थाने न्याय देण्यासाठी काम करावे; असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ॲड.डॉ.बाबूराव हिरडे यांनी केले.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त तालुक्यातील पत्रकारांचा सत्कार आयोजित केला होता. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ॲड.हिरडे बोलत होते. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश चिवटे, ज्येष्ठ पत्रकार नासीर कबीर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार, शाम सिंधी, भाजपा प्रज्ञा सेलचे जिल्हाध्यक्ष व पत्रकार सुहास घोलप, संजय घोरपडे, बाळासाहेब कुंभार, किसान मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस नरेंद्रसिंह ठाकूर, जितेश कटारिया व पत्रकार बांधव उपस्थित होते. पुढे बोलताना ॲड.हिरडे म्हणाले, की भाजपाच्या सर्व पक्षीय, सामाजिक कार्यक्रमांना पत्रकार बांधवांनी प्रिंट व डिजीटलच्या माध्यमातून आत्तापर्यंत न्याय दिला आहे. आजच्या परिस्थितीमध्ये पत्रकारिता करणे सोपे राहिले नाही. डिजीटल पत्रकारितेचे युग असलेतरी वाढत्या स्पर्धेमुळे खुश मिस्करी करणाऱ्यांची संख्या वाढल्याने पत्रकारांना समाजाला न्याय देताना तारेवरची कसरत करावी लागते. त्यासाठी आर्थिक ताण सहन करून पत्रकारिता करावी लागत आहे. दैनिकाकडूनही जाहिरातींचा कोटा पूर्ण करण्यासाठी दबाव वाढत आहे. पोर्टल, युट्यूब सोशल मिडीयामुळे जाहिरातीवरही मर्यादा आली आहे. त्यामुळे पत्रकारांचे आर्थिक गणित कोलमडले असून त्यांच्या कुटूंबियांना शासनाकडून कुठल्याही प्रकारचे अनुदान सवलती मिळत नाहीत. शासनाने सर्व घटकांना न्याय दिला आहे; परंतु समाजासाठी अविरत झटणाऱ्या पत्रकारांना मात्र अद्यापही सोयी सवलतीपासून वंचित ठेवले आहे. पत्रकार कल्याणकारी महामंडळाची घोषणा झाली असलीतरी आर्थिक तरतूद होणे गरजेचे आहे. पत्रकारांना त्यांच्या कुटूंबासाठी मोफत वैद्यकिय विमा, कुटूंब कल्याण योजना राबवणे ही खरी काळाची गरज आहे. भाजपाची केंद्रात व राज्यात सत्ता आहे. त्यामुळे पत्रकारितेची परंपरा जपण्यासाठी शासनाने पत्रकारांना न्याय देण्याचे काम करावे; अशीही मागणी ॲड.हिरडे यांनी केली.

यावेळी उपस्थित सर्व पत्रकार बांधवांचा सत्कार भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार, जिल्हा सरचिटणीस शाम सिंधी, विनोद महानवर, भाजपा किसान मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस नरेंद्रसिंह ठाकूर, संजय घोरपडे, नितीन कांबळे, शहराध्यक्ष जितेश कटारिया, आदेश कांबळे, सचिन चव्हाण यांचे हस्ते डायरी, पेन, शाल, गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात करण्यात आला. प्रास्ताविक नरेंद्रसिंह ठाकूर व सुत्रसंचालन विनोद महानवर यांनी केले.आभार संजय घोरपडे यांनी मानले.

समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह

डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)

डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)

उपलब्ध सुविधा.. ● गरोदर माता तपासणी व उपचार ● सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर ● नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे ● मासिक पाळीचे आजार निदान व उपचार ● वंध्यत्व निवारण ● सिझेरियन प्रसुती ● गर्भशयाचे आजार निदान व उपचार ● मेनोपॉज क्लिनिक

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)

● नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) ● व्हेंटिलेंटरची सोय
● बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) ● CPAP ● Pulsoximeter
● दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) ● वाफेची सोय (Nebulizer)
● बाल दमा निदान व उपचार ● सेंट्रल ऑक्सिजनची सोय ● 02 Concentrator

गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

# भाजपा युवा मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी शुभम बंडगर



करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुका भाजपा युवा मोर्चाच्या अध्यक्ष पदी शुभम शिवाजीराव बंडगर यांची निवड झाली आहे. ही निवड भाजपा युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनी केली आहे. शुभम बंडगर हे करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रा.शिवाजीराव बंडगर यांचे चिरंजीव आहेत. ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून विविध कामे करत होते. त्यांच्या निवडीबद्दल महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांनी अभिनंदन केले आहे.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
● एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेट्री

डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद | वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

घोलप हार्डवेअर

● प्लंबिंग मटेरियल ● नट बोल्ट ● झाडू
● कॅरेट ● मग ● टब ● नायलॉन दोर
● ताडपत्री ● प्लास्टीक कागद

कृषी संदर्भातील सर्व साहित्य मिळेल.

संपर्क : मो.नं.9922111204

पत्ता :– रिलायन्स पेट्रोलपंपासमोर, बायपास रोड, शाहुनगर, करमाळा., जि.सोलापूर

श्वेता गिफ्ट & टॉईज

2025 या नवीन वर्षात मकरसंक्रांतीनिमित्त

विशेष डिस्काऊंट ऑफर

आपल्या लाडक्या मुला-मुलींच्या वाढदिवसानिमित्त

आकर्षक रिमोट कंट्रोल इलेक्ट्रीक थार (जीप) भेट द्या !

पत्ता : श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.

(9822058106, 7798307085)

# जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत वीट शाळेचा संघ प्रथम



करमाळा(सं.प्र.): सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित लहान गट खो-खो स्पर्धेत जि.प.शाळा वीट संघाने मंगळवेढा या संघाचा पराभव करत प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

केंद्रप्रमुख वैशाली महाजन, शिक्षक नेते सुनील कदम, महेश होनकळसे, गणेश कोरपे, अभिजीत गायकवाड, तात्यासाहेब जगताप, दादासाहेब बरडे, तात्यासाहेब जाधव, विनोद ढेरे, गोरख ढेरे, मेजर संदीप ढेरे, भाऊसाहेब गायकवाड, संजय चोपडे यांनी ही स्पर्धा पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. विजेत्या संघातील खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांची वीट गावातून मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी संघाचे मार्गदर्शक गोरख ढेरे सर, चंद्रहास चोरमले, सूरज शेवाळे यांच्यासह यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले. वीट विकास फाऊंडेशन व ग्रामपंचायत वीट यांचे संयुक्त विद्यमाने जेवणाची व्यवस्था करण्यात आली.

# रेवती विजय अवघडे हिला वकिलीची सनद प्राप्त



करमाळा(सं.प्र.): केम येथील रेवती विजय अवघडे हिने महिला वकील होण्याचा मान मिळविला आहे. रेवती हिने सातारा येथील इस्माईल साहेब मुल्ला या विधी महाविद्यालयातून एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले असून सनद प्राप्त झाली आहे. तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण केम येथे झाले. पुढील बी.एस्सी व एलएल.बी चे शिक्षण सातारा येथील महाविद्यालयातून पूर्ण केले. तिच्या या यशाबद्दल केम व परिसरातून तिचे विशेष अभिनंदन केले .

खुशखबर खुशखबर
मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात
**डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध**
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
**डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)**

**उपलब्ध सुविधा...**
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

**ओपीडी /ऑपरेशन ठिकाण**
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
**लोकरे हॉस्पिटल**
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
**डॉ.विकास देविदास नागरगोजे**
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



**ओपीडीचे वैशिष्ट्ये...**
● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा ● प्रभावी औषधी सुविधा ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग ● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● पार्किंगची व्यवस्था ● आठवड्यातून दोनदा ओपीडी

**विशेष सुचना...** १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

**नाव नोंदणीसाठी संपर्क**
मो.9763035862

बार्शी **धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल** कोर्ट समोर, बार्शी.

**खुला प्लॉट विकणे आहे**
बागवाननगर येथील आतील १५ मीटर रोडटच असलेला खुला प्लॉट(१८८७ स्क्वे.फुट) योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे
**संपर्क : मो.8855907055**






कणभर तीळ.., मनभर प्रेम..
गुळाचा गोडवा.., आपुलकीचा गोडवा..
तिळगुळ घ्या.., गोड-गोड बोला..!

आजपासून वर्षातील पहिल्या सणाची सुरूवात
आम्ही तुम्हाला शुभेच्छा देऊन
या उत्सावाची करतो सुरूवात..!!




मेनरोड, इंदापूर, जि.पुणे. । मो.नं.9404239600, 9860813001


ओंकार ज्वेलर्स
अल्लड रुपाला माझ्या
शोभतो हा दागिना
जोडवे,पैंजण,
हार,बिंदी
तुझ्याचसाठी साजणा...
शाखा नं : १) गुजर गल्ली, करमाळा.
शाखा नं : २) मेन रोड, भंडारे हॉस्पिटल शेजारी, करमाळा.
83790 27471 I 9921316955


आमचे मित्र
मा.श्री.
लक्ष्मण नागु भांगरे
यांची पदोन्नतीने
'पोलीस उपनिरीक्षक' पदी
निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
श्री.तुकाराम सोरटे
शुभेच्छुक
● तुकाराम सोरटे व परिवार, श्रीदेवीचामाळ
● श्री.बोटे(PSI), श्री.गांगुर्डे(PSI), श्री.पोपिरे(PSI)
● श्री.गायकवाड(PSI), ॲड.नीळ(करमाळा)
● होमगार्ड पथक व सर्व मित्र परिवार


पारेवाडी येथील सेवानिवृत्त आदर्श शिक्षक
मा.श्री.परबत सखाराम जाधव
आपणांस दि.१३ जानेवारी रोजी असलेल्या ८७ व्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मुलगा - नानासाहेब जाधव
जावई - चांगदेव घोगरे, दादासाहेब मोहिते, विजयकुमार काळे, वसंत घोगरे
पत्नी - सौ.धनश्री जाधव मुली - सौ.अनिता, सौ.सुवर्णा, सौ.कल्पना, सौ.वैशाला
सुन : सौ.तेजस्वीता, सर्व नातू, नाती व जाधव परिवार


गुळाचा गोडवा येऊ दे जीवनाला...,
तीळाची उब लाभू दे आपल्या नात्याला !
सोनी ज्वेलर्स
आकर्षक व सुबक
सोने-चांदीचे
दागिणे मिळण्याचे
सुवर्णदालन !
HAPPY
Makar
Sankranti
आकर्षक व शुध्द
चांदीचे जोडवे व भांडी मिळतील
● रवि सोनी 9421029869
● अजित सोनी 9423336932
916 हॉलमार्क सोने-चांदी
व राशी खड्यांचे व्यापारी
● पत्ता : मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर ४१३२०३

नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
न्यु. प्रविण सुपर मार्केट
रोगप्रतिकारक क्षमता आणि निरोगी बनण्यासाठी आवश्यक गावरान कडधान्य
- मटकी(बारीक गावरान) : ११० रू. किलो
- हरभरा : ८० रू. किलो
- हुलगा : ८० रू. किलो
- मुग : ११० रू. किलो

५व्या वर्धापन दिनानिमित्त खास ऑफर
- शाबुदाणा : ६० रू. किलो
- शेंगदाणे : ९० रू. किलो
- मसुर डाळ : ९० रू. किलो
- गावरान तीळ : १८० रू. किलो
- शारदा तारा तांदुळ : ६२ रू. किलो
- इंद्रायणी तुकडा (बेस्ट) : ४५ रू. किलो
- इंद्रायणी ओरिजनल : ६८ रू. किलो
- चिलख्यासह मुगडाळ : १२० रू. किलो
- खारीक : १६० रू. किलो
- राळ्याचे तांदुळ : १०० रू. किलो
- इंद्रायणी तांदुळ (५ कि) आकर्षक पॅकींग- ३४० रू.
- गावरान ज्वारी : ३५ रू. किलो
- गावरान गहू : ३९ रू. किलो
- गावरान बाजरी : ३४ रू. किलो
- गावरान मोठा शेंगदाणा : १०० रू. किलो

मकरसंक्रांतसाठी वाणाचे सर्व साहित्य होलसेल भावात मिळेल..!
ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा
मो.9168052318

कामगार पाहिजे
ऑफिस कामासाठी
मुलगी/मुलगा पाहिजे
शिक्षण : बारावी ते पदवीधर
(संगणकाचे ज्ञान आवश्यक)
अपेक्षित पगार मिळेल.
कामाची वेळ : सकाळी ९ ते १
संपर्क
मो.7709003355
मो.9423237685

## दहिगाव सबस्टेशन येथे नवीन ट्रान्सफार्मर बसवावा : संजय सावंत



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या दहिगाव सबस्टेशन वर नवीन ट्रान्सफार्मर बसविण्यात यावा; अशी मागणी माजी नगरसेवक संजय सावंत यांनी आमदार नारायण पाटील यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात श्री.सावंत यांनी म्हटले आहे, की करमाळा शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी सध्या दहिगाव सबस्टेशन येथे जेऊरवरून वीजपुरवठा केला जातो. परंतु जेऊर ते दहिगाव दरम्यान अनेक वेळा नैसर्गिक आपत्ती येऊन वीज पुरवठा खंडीत होतो. परिणामी शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होतो. त्यामुळे दहिगाव सबस्टेशन येथे नवीन ट्रान्सफार्मर बसविण्यात आल्यास तेथे वीजपुरवठा खंडीत होणार नाही आणि शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होईल; असेही सावंत यांनी निवेदनात म्हटले आहे.

## नवभारत इंग्लीश स्कुल मध्ये बालिका दिन साजरा

करमाळा(सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडियम स्कूल व ट्विंक्लींग स्टार्स मध्ये बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रागिणी कोंगे या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून रेश्मा दोशी, करिष्मा दोशी व घडके मॅडम उपस्थित होत्या. सुरूवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवर व शाळेतील महिला शिक्षिका यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वाती काळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सविता पवार यांनी मानले. या कार्यक्रमास पालक, विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

## नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर येथे भव्यदिव्य विज्ञान प्रदर्शन

करमाळा(सं.प्र.): येथील नगरपालिकेच्या नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर येथे भव्यदिव्य असे विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. यामध्ये एकूण ३९२ विद्यार्थी सहभागी झाले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे यांचे हस्ते झाले. यावेळी बाजार समितीचे संचालक जयवंतराव जगताप, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे गणेश करे-पाटील, सामाजिक कार्यकर्ते श्रेणिकशेठ खाटेर, स्त्रीरोग तज्ञ डॉ.निलेश मोटे, केंद्र समन्वयक दयानंद चौधरी, व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा डॉ.वर्षा करंजकर आदी मान्यवर उपस्थित होते. पाणी शुध्दीकरण, संगणक, स्टेटस्कोप, होलोग्राफ, तरंगणाऱ्या व न तरंगणाऱ्या वस्तू, हवेचा दाब, पवनचक्की, ग्रह, फुफ्फुसाचे कार्य, सोलर सिस्टीम, ज्वालामुखी, मुळांचे कार्य, एटीएम मशीन, पाणी उपसा यंत्र, क्रेन, गिरणी, इलेक्ट्रीक शिडी, मॅजिक बॉक्स, मातीचे थर, पाण्याची घनता, पाण्यातील हवेचा दाब, सौर ऊर्जा, इलेक्ट्रीक गाड्यांचा वापर, जलचक्र, चांद्रयान, अभयारण्य, खाऱ्या पाण्यातून विद्युत प्रवाह, नोटांची मशिन, पाऊस शोधक यंत्र, प्रकाश संश्लेषण, ठिबक सिंचन, शेती व मत्स उत्पादन, ओला सुका कचरा, विहिरीतून पाणी काढण्याचे यंत्र आदी विविध प्रकारचे विज्ञान साहित्य विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात ठेवले होते. हे प्रदर्शन पाहण्यासाठी सर्व स्तरातील नागरीकांनी मोठी गर्दी केली होती. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका सुनंदा जाधव, सुरेश जाधव,सुरेश कोळी, लालासाहेब शेरे, सुनिता उबाळे, सुनिता भैलुमे, धनश्री उपळेकर, आशा अभंगराव, वैशाली जगताप, मंगल गलांडे, अश्विनी ठाकरे, सुषमा केवडकर, गौरव पलिकोंडवार, सुरेखा कांबळे आदींनी परिश्रम घेतले.



## बाळासाहेब शिंदे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

करमाळा(सं.प्र.): शैक्षणिक व क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सोलापूर जिल्हा प्रकार शिक्षक संघटनेच्या वतीने भारत हायस्कुल जेऊरचे शिक्षक बाळासाहेब शिंदे यांचा ज्योतिबा सावित्री जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. शिंदे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व आमदार नारायण पाटील, उपाध्यक्ष राजूशेठ गादीया, सरपंच पृथ्वीराज पाटील, सचिव प्रा.अर्जुन सरक यांनी त्यांचे अभिनंदन केले.

बंगला विकणे आहे
मथुरानगर मधील
2 BHK बंगला योग्य
किंमत आल्यास विकणे आहे.
संपर्क
मो.9689557710
मो.9423237685

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
चिवटे उपहारगृह

| साऊथ इंडियन | नाश्ता | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर, उडीदवडा सांबर, उत्तप्पा, डोसा | पुरी भाजी, मिसळ पाव, पोहे/उपमा, दहीवडा/शिरा | पावभाजी, तवापुलाव, सँडविच, फिंगर चिप्स | पाणीपुरी, स्पे.भेळ, रगडा पॅटिस, राज कचोरी | पेढा, बर्फी, लाडू, जामून, मैसुरपाक, काजू कतली | फरसान, शेव, स्पे.चिवडा, पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी
साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५
कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

श्री गजानन अगरबत्ती
- सुगंधी अगरबत्ती
- कापूर
- अत्तर
- धूप
- भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

## कृषी उत्पन्न बाजार समितीत स्व.नामदेवराव जगताप यांची जयंती साजरी



करमाळा(सं.प्र.): येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये जिल्ह्याचे भाग्यविधाते, माजी आमदार देशभक्त नामदेवराव जगताप यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन खरेदी-विक्री संघाचे चेअरमन शंभुराजे जगताप यांचे हस्ते झाले. पुष्पहार अर्पण माजी उपनगराध्यक्ष ॲड.कमलाकर वीर, बाजार समितीचे संचालक मनोज पितळे यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी खरेदी-विक्री संघाचे संचालक हनुमंत ढेरे, बाजार समितीचे माजी संचालक मयूर दोशी, माजी सचिव दत्तात्रय क्षीरसागर, सचिव विठ्ठल क्षीरसागर, सहाय्यक सचिव रविंद्र उकिरडे, व्यापारी प्रितम लुंकड, राजेंद्र चिवटे, तालुक गटसचिव पतसंस्थेचे चेअरमन अनिल सुरवसे, जिल्हा बँकेचे बँक इन्स्पेक्टर नगरे, व्यापारी, कर्मचारी, शेतकरी, गटसचिव उपस्थित होते.

## चव्हाण महाविद्यालयात स्व.नामदेवराव जगताप यांची जयंती साजरी



करमाळा(सं.प्र.) : विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष देशभक्त स्व.नामदेवराव जगताप यांची जयंती साजरी करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड यांनी स्व.नामदेवराव जगताप यांनी करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी उजनी धरण, मांगी तलाव, कुकडी प्रकल्प कशा पध्दतीने राबवले. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी विद्या विकास मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची स्थापना केली; असे आपल्या मनोगतातून स्व.जगताप यांचे विषयी गौरवोद्‌गार काढले. यावेळी सचिव विलासराव घुमरे, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.वंदना भाग्यवंत यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.हनुमंत भोंग यांनी मानले.

**फ्लॅट विकणे आहे**

ICICI बँकेच्या जवळ असलेला १२५० स्क्वे.फूट चा फ्लॅट फर्निचर सहीत योग्य किंमत आल्यास विकणे आहे.


संपर्क
मो.9423237685

**सा.कमलाभवानी संदेश**
**वार्षिक वर्गणी २०० रू.**

**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

करमाळा शहरात प्रथम सुरू..!
Reg no.42433
**पाटील स्किन, हेअर ॲन्ड जनरल क्लिनिक**
डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील
( Clinical Cosmetologist & Trichologist )





उपलब्ध सुविधा
• त्वचा : P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोक्नीडलिंग, ॲंटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, बांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
• केस : P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे
• सर्व आजारांवर उपचार • रक्त लघवी तपासणी • लहान मुलांना वाफ देणे • सांधेदुखी, कंबरदुखी • होमिओपॅथिक उपचार
पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573

## उमरड शाळेत आजी-आजोबा पाद्यपूजन दिन साजरा



करमाळा(सं.प्र.) : आनंददायी उपक्रमांतर्गत उमरड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आजी-आजोबा पाद्यपूजन दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांचे पूजन करून त्यांना वंदन केले. यावेळी सरपंच प्रमोद बदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय कोठावळे, पोलीस पाटील अंकुश कोठावळे यांचे हस्ते या उपक्रमाचे उद्‌घाटन झाले. यावेळी आजी-आजोबांची संगीत खुर्ची हा मनोरंजक खेळ घेण्यात आला. यावेळी पोलीस पाटील कोठावळे यांनी आजी-आजोबांचा सन्मान करणे, त्यांना नातवावर प्रेम दाखवण्याची संधी देणे व विद्यार्थ्यांना वृध्दांचे मार्गदर्शन व्हाव; या उद्देशाने शाळेने राबविलेला हा उपक्रम नातेसंबंध जपण्यासाठी उपयुक्त असल्याचे सांगितले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक अंकुश अमृळे, शिक्षक दिलीप भोसले, बापूसाहेब भोसले, संदीप ढाकणे, मुकूंद राऊत, अनिल यादव, मेघना साळुंखे यांनी परिश्रम घेतले.

## घोटी येथील मारूती रामचंद्र शेंडे यांचे निधन




करमाळा(सं.प्र.) : घोटी येथील मारूती रामचंद्र शेंडे (वय-११५) यांचे वृध्दपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या मागे २ मुले १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. घोटी येथील दूध उत्पादक संस्थेचे चेअरमन मोहन शेंडे यांचे ते वडील होते. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते. वयाचे शतक पार करणारे मारूती शेंडे हे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

**जागा विकणे आहे**

करमाळा शहरातील भवानीपेठेतील रोडटच असलेली (३८ X १६७) एकूण ६३५० स्क्वे.फूट जागा योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.

संपर्क : मो.8888400555



**साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्**

सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.





प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

# प्लॉट विकणे आहे

करमाळा शहरातील नगरपरिषद हद्दीतील तहसील एन.ए. प्लॉट (गट क्र.२९४/१/अ/२) २१ गुंठे, चारही बाजूने जाळीचे कुंपण असलेला बंदीस्त व स्वतंत्र सातबारा असलेला रिकामा प्लॉट योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे

पत्ता : गिरधरदास देवी विद्यालय समोर, माने वस्तीमध्ये, पुणे रोड, करमाळा.

संपर्क : शिंदे (८०८७७१८३१७), काळे (९८५०९०७००१)



# आयेशा

ड्रेस मटेरियल & हिजाब सेंटर

चांगल्या क्वालिटीचे

- ड्रेस मटेरियल
- बुरखा
- मकणी व नकाप

मिळण्याचे एकमेव ठिकाण !





टीप : लग्न समारंभासाठी लागणाऱ्या काचेच्या बांगड्याची ऑर्डर स्विकारली जाईल.

अत्यंत रूचकर व चवीष्ठ जेवणाचा

**घरगुती डबा मिळेल**

- १ डबा : ६० रू.
- दररोज १ डबा : १५०० रू.(महिना)
- दररोज २ वेळ डबा : २५०० रू.(महिना)

पत्ता : कानाडगल्ली, पेट्रोलपंपाशेजारी, करमाळा. परवीन तांबोळी (9699859227)


## श्रीदेवीचामाळ येथे २ लाख १५ हजाराची चोरी

करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथे पहाटेच्या दरम्यान चोरट्यांनी घरातील आतील कडी काढून घरात प्रवेश करून लोखंडी कपाट उघडून २ लाख १५ हजार रूपयाची चोरी केली आहे. यामध्ये ३५ हजार रूपये रोख व उर्वरित सोन्याचे दागिणे आहेत. हा प्रकार ३ जानेवारीला पहाटे घडला आहे. या प्रकरणी अशोक पांडूरंग डोंगरे (रा.कस्तुरबा नगर, श्रीदेवीचामाळ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २ जानेवारीला आम्ही जेवण करून घरात झोपलो असता, पहाटेच्या दरम्यान चोरट्याने दरवाजाला छिद्र पाडून, आत हात घालून कडी काढून घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाट उघडून त्यातून २० ग्रॅम सोन्याचे मनीमंगळसुत्र, १० ग्रॅम सोन्याची चैन, ६ ग्रॅम सोन्याचे झुबे व ३५ हजार रूपये रोख असा २ लाख १५ हजार रूपयाचा ऐवज चोरीला गेला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## नववर्षात दोन पुरूष व एक महिला बेपत्ता

करमाळा(सं.प्र.) : सन २०२५ या नववर्षाच्या सुरूवातीलाच मंगळवार पेठेतील ३४ वर्षाचा तरूण लखन तुळशीराम वाघमारे हे हरवले आहेत. याबाबत १ जानेवारीला करमाळा पोलीसात नोंद करण्यात आली आहे. तर २ जानेवारीला जातेगाव येथील २५ वर्षाचा युवक विवेकानंद बजंगे हाही हरवला असल्याची तक्रार बजंगे परिवारातील प्रतिनिधींनी करमाळा पोलीसात दिली आहे. ६ जानेवारीला पिंपळवाडी (ता.करमाळा) येथील २९ वर्षाची महिला बेपत्ता झाली आहे. एकंदरीत नवीन वर्षात पहिल्याच आठवड्यात दोन पुरूष व एक महिला बेपत्ता झाली आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## पतीकडून पत्नीस बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.) : दुसरे लग्न करू नको, असे म्हटल्यावरून पतीने पत्नीस लोखंडी सत्तूरने मारून गंभीर जखमी केले आहे. हा प्रकार ३ जानेवारीला रात्री आठच्या सुमारास नेरले येथे घडला आहे. या प्रकरणी अर्चना आजिनाथ काळे (रा.नेरले) या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ३ जानेवारीला रात्री आठ वाजता मी व पती जेवण करत असताना माझे पतीने दुसरे लग्न करायचे आहे असे सांगितले. त्यावेळी मी दुसरे लग्न करू नका.. असे म्हणाले असता माझ्या पतीने लोखंडी सत्तूर माझ्या डोक्याच्या पाठीमागे मारून मला गंभीर जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## केटरर्सच्या मोटारसायकलची चोरी

करमाळा(सं.प्र.) : कंदर येथील लग्नामध्ये केटरिंगचे काम करण्यासाठी आलेल्या केटरर्सच्या मोटारसायकलची चोरी झाली आहे. हा प्रकार २४ डिसेंबरला सकाळी साडेदहा ते दुपारी तीनच्या दरम्यान कंदर येथे घडला आहे. या प्रकरणी विलास लक्ष्मण काळे (रा.विझोरी, ता.माळशिरस) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की केटरर्सच्या कामासाठी कंदर येथे गुरूसेवा मंगल कार्यालयात २४ डिसेंबरला सकाळी साडेदहा वाजता आलो होतो. दुपारी साडेबाराचे लग्न संपून साडेतीन वाजेपर्यंत जेवणाच्या पंक्ती उरकल्या. त्यानंतर परत जाण्यासाठी मोटारसायकल लावलेल्या जागेची व्यवस्था चोरट्यांनी माझी मोटारसायकल चोरून नेली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## वायर सोडू नका म्हटल्याने चौघाकडून एकास बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.) : शेतातील वीज कनेक्शनची वायर सोडू नका.. असे म्हटल्याने चौघांनी एकास बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार कुंभेज येथे ३ जानेवारीला दुपारी दोन वाजता घडला आहे.या प्रकरणी ज्योतीराम बबन माने (रा.कुंभेज) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ३ जानेवारी ला दुपारी दोन वाजता पीकावरफवारणी करत असताना अंकुश दत्तू माने, लहू दत्तू माने, सौरभ अंकुश माने, रोहित दत्तू माने (रा.कुंभेज) हे सर्वजण विहिरीवरील वीजेच्या कनेक्शनची वाय सोड्वून घेत असताना वायर का सोडता असे म्हणालो असता, या चौघांनी शिवीगाळ व दमदाटी करून मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.


आमच्या सर्व ग्राहकांना मकरसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा !

# लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स

होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर



प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी कॉटन साडी, पार्टीवेअर साडी,लेडीज टॉप व कुर्ती, लेगीज, किड्स वेअर योग्य दरात मिळतील.

टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.

मकरसंक्रांती निमित्त

**पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध**



पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०९२१८७)



# प्लॉट विकणे आहे

बालाजीनगर शेजारील तीन गुंठे एन.ए. प्लॉट योग्य किंमतीत विकणे आहे

संपर्क

मो.9926449274

मो.9423237685



# गाळे भाड्याने देणे आहे

संगोबा रोडवरील चांदगुडे प्लॉट मधील रोडटच असलेले आदिनाथ महाराज कॉम्प्लेक्स मधील गाळे भाड्याने देणे आहे

संपर्क : 9552997035, 9657874179, 9822921962



# भाड्याने देणे आहे

प्रतापसिंह मोहिते-पाटील कॉलेज जवळ, पुणे रोड, करमाळा येथील सर्व सुविधायुक्त ८५०० स्क्वे.फूट ओपन प्लॉट भाड्याने देणे आहे

संपर्क : मो.नं.8379027471



# पुनम एजन्सी

अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक

Ambuja Cement

- बिल्डींग मटेरियल सप्लायर्स

स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट

- प्लंबींग
- हार्डवेअर

होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल

प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

# जिद्दीच्या जोरावर विविध पदविका आणि समाजकारणा बरोबरच व्यवसायही !

थोडा पैसा.., थोडी हाव..,
थोडा थाट.., थोडा बडेजाव..
सगळ्यांच्या तोंडी आपलंच नाव..,
जगण्यासाठी अजून काय हवं..!
एक शक्ती एक भक्ती, एक सूड एक आसक्ती
ठायी असेल युक्ती तर...,
जगण्यासाठी अजून काय हवं..!
एक सूर्य एक चंद्र, एक दिवस एक रात्र
फक्त सगळं समजायला हवं..
जगण्यासाठी अजून काय हवं..!

खरंच माणसाला जगण्यासाठी काय लागतं. तसं पाहिलंतर काहीच लागत नाही. पण मनात जिद्द असेलतर पृथ्वी पादाक्रांत करायलाही वेळ लागत नाही. अशाच स्वरूपाची समाजात काही जिद्दी माणसं असतात की, ती सतत वेगवेगळे क्षेत्र आकलन करतात आणि स्वत:ला तर प्रगल्भ बनवतातच; पण आपल्या सोबतच्या समाजातही आनंद पेरण्याचं काम करत असतात. अशाचप्रकारच्या करमाळा शहरातील सौ.रेश्मा विजयकुमार जाधव या विवाहितेचा प्रवास सुरू आहे.

हुंबे वस्ती (मांजरगाव) सारख्या छोट्याशा वस्तीवर पहिली ते चौथी शिक्षण घेऊन राजेश्वर विद्यालयात दहावी पर्यंत तर कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयात विज्ञान शाखेत बारावीचे शिक्षण झाले आणि घरातून लग्नाची चर्चा सुरू झाली. अर्थातच



> माझ्या माहेरी अध्यात्मिक संस्कार मिळाल्याने लहानपणापासून मला अध्यात्म, संगीत व योगाची आवड होती. तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील शिक्षण घेऊन ज्ञान आत्मसात करण्याची इच्छा होती. माझ्या लग्नानंतर माझे पती डॉ.विजयकुमार जाधव यांनी मला पूर्ण पाठबळ दिले. एवढेच नाहीतर शिक्षणाच्या खर्चासाठी कधीही हात आखडता घेतला नाही. एवढेच नाहीतर प्रशिक्षणासाठी बाहेर जाताना कधीही आडविले नाही. या विश्‍वासामुळेच मला वेगवेगळ्या पदविका मिळविता आल्या व वेगवेगळ्या क्षेत्रात काम करता येत आहे. यापुढेही जास्तीत जास्त ज्ञान मिळविण्यावर माझा भर राहणार आहे. तसेच समाजातील सर्वसामान्य विशेषत: वृध्दांची व गोसेवा करण्याची माझी इच्छा आहे..!
>
> **...सौ.रेश्मा विजयकुमार जाधव (मो.९५२७७५०९५९)**

या चर्चेने पुढील शिक्षणाला जवळपास पूर्णविराम मिळाला होता. सन २०१० साली शेलगाव(क) चे जाधव परिवारातील डॉ.विजयकुमार जाधव यांचे बरोबर विवाह जमला आणि १ जून २०१० ला विवाह संपन्न झाला. लग्नानंतर पतीची साथ आणि सासूचे पाठबळ यातून रेश्मताईंनी पाठीमागे पाहिलेच नाही. लग्नानंतर मुक्त विद्यापीठातून बी.ए. केले. त्यानंतर कला व कार्यानुभव प्रशिक्षण पूर्ण केले. ग्रंथपाल पदविका पूर्ण केली. स्थापत्य अभियांत्रिकी पदविका प्राप्त केली. सर्व्हेअर प्रमाणपत्र पदविका आणि योग प्रशिक्षण एक वर्षाचा कोर्स पूर्ण केला. अशाप्रकारे एका पाठोपाठ एक पदव्या मिळवत रेश्माताईंनी जिद्दीच्या जोरावर वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्ञान आत्मसात केले. या कालावधीत त्यांना कृष्णा (इ.७ वी) व कन्या स्वराली (इ.५ वी) ही दोन मुले झाली आहेत. मुलेही शाळेत हुशार असून मोठी स्वप्नं पाहत वाटचाल करत आहेत. अशातच रेश्माताईंनी पारमार्थिक अभ्यास सुरू करून ज्ञानेश्‍वरी, नवनाथ, भागवत या ग्रंथाचा अभ्यास केला असून गुरूवर्य श्रीकांत साखरे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञान प्रसाराचे काम करत आहे. याबरोबरच त्या करमाळा शहरात योग प्रशिक्षणही घेतात. सध्या त्या गर्भसंस्कार प्रशिक्षणाची पदविकाचा अभ्यास करत आहेत. त्याबरोबरच श्री सद्गुरू आयुर्वेदिक केंद्रही त्या चालवतात. जिल्हा परिषद शाळा, करंजे येथे हस्तकला व कार्यानुभव चे शिक्षक म्हणून त्यांनी काम केले आहे. एवढेच नाहीतर करमाळा शहरातील कमलादेवी कन्या प्रशालेत लॅब असिस्टंट म्हणून दोन वर्षे काम केले आहे. नव्याने त्यांनी पर्यावरणाला पोषक असा व्यवसाय म्हणजे स्वराली ई.व्ही. चार्जींग सेंटर, नगररोड येथे सुरू केले आहे. या सर्व व्यापातून वेळ काढून त्या सध्या सुरताल संगीत विद्यालयात संगीत विशारद या पदविकेचाही अभ्यास करत आहेत.

एक युवती संसार सांभाळून, मुलांवरती संस्कार करत विविध व्यवसाय करत, नव्यानव्या क्षेत्रातील ज्ञान आत्मसात करते आणि स्वत:ला परिपूर्ण बनविण्यासाठी कशी संघर्ष करते.. याचे एकमेव उदाहरण म्हणजे सौ.रेश्मा विजयकुमार जाधव यांचेच नाव घेता येईल.

### मिळालेले पुरस्कार...

- लेक लाडकी अभियान अंतर्गत 'भारत राष्ट्र गौरव प्रेरणा' पुरस्कार मुंबई महापौर यांचे हस्ते मिळालेला आहे.
- आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय पर्यावरण संस्थेचा 'महिला उद्योजिका' म्हणून पुरस्कार मिळाला आहे.
- आंतरराष्ट्रीय पर्यावरण बहुउद्देशीय संस्थेच्या सोलापूर जिल्हा 'महिला सल्लागार' म्हणून निवड.
- ओमसाई विकास प्रतिष्ठान, कानडगाव (ता.राहुरी) यांचा 'साई कलागुण गौरव' पुरस्कार देण्यात आला आहे.

॥ श्री कमलाभवानी प्रसन्न ॥
सोनाली प्लाय फर्निचर
डोअर, स्लायडिंग विंडो अँड SS स्टिल रेलिंग तयार करून मिळेल.




शिवाजी खाडे मो.९४०४२९९६९६ जगन्नाथ खाडे मो.९८५०९३०७७५
गाळा नं.४७ / ४८, जामखेड रोड, करमाळा, ४१३२०३ जि.सोलापूर

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड अँड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेब्रिकॉल • वुडन फ्लोरींग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जुन्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !




एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.


मे.
आनंदी
ज्वेलर्स | डायमंड
मकरसंक्रांत
डबल
धमाका ऑफर
सोने खरेदीवर
चांदी फ्री
व लकी ड्रॉ कुपन
प्रत्येक दागिना खरेदीवर
एक लकी ड्रॉ कुपन
— कालावधी —
3 ते १३ जानेवारी २०२५
दररोज 3 लकी ड्रॉ भाग्यवान
विजेत्यांना सोन्याची नथ
मेन रोड, करमाळा 9420915099 9970020035
*नियम व अटी लागू


संक्रांतीचा गोडवा
पैठणीने वाढवा!
पैठणी
महोत्सव
मनपसंद पैठणीच्या अनेक व्हरायटी...
चंद्रकोर पैठणी, नथ पैठणी,
म्हाळसा पैठणी, मुनिया पैठणी,
कलांजली पैठणी, शिवशाही पैठणी
एल.डी.
बलदोटा
आकर्षक साड्या • मेन्स वेअर • लेडिज वेअर • किडस् वेअर • गृहसजावट
मेन रोड, जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापूर मो. : 9096586755
*अटी लागू